पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र. ३१०६** **दि. २७ /०९ /२०१९**

## डेक्कन पोलीस स्टेशन, पुणे शहर

## नागरिकांची इमानदारी व पोलीसाच्या मदतीमुळे हरवलेला मोबाईल मालकास परत मिळाला.

दिनांक १९/०९/२०१९ रोजी श्री. निकाळजे, पोहवा ५६४१ यांना प्रभात पोलीस चौकीस दिवसपाळी ड्युटी असतांना श्री. अनिल चड्डा, रा. थोरात कॉलणी, कर्वेनगर पुणे मो. ९३१५०९६३५६ यांना दुचाकी वरुन घरी जात असतांना वुडलँड हॉटेल जवळील चौकात रस्त्यामध्ये कोणाचा तरी मोबाईल पडल्याचे दिसले त्यांनी ओपो कंपनीचा एफ ११ मोबाईल ताब्यात घेवुन सदर ठिकाणी १० ते १५ मिनिट सदर चौकामध्ये थांबले. परंतु मोबाईल घेण्यासाठी कोणीही न आल्याने त्यांनी सदरचा मोबाईल प्रभात पोलीस चौकी येथे जमा केला. पोलीस हवालदार श्री निकाळजे यांनी मोबाईल मध्ये येणारे कॉल वरुन मोबाईलचे मालक संदीप कोंडीबा कोलापटे, दशभुजा गणपती मंडळ शेजारी, बराटे चाळ, वारजे माळवाडी, पुणे यांना प्रभात पोलीस चौकीस बोलावुन घेवुन त्यांचा मोबाईल हॅन्डसेट त्यांना परत देण्यात आला. संदीप कोलापटे यांनी आपला मोबाईल परत मिळाला म्हणुन श्री  निकाळजे पोहवा ५६४१ यांचे आभार मानले.

